

# बेरीज : पुढे मोजून




पाच अधिक तीन ही बेरीज करु. पाचच्या पुढील तीन संख्या क्रमाने मोजू. **६, ७, ८.** एकूण मणी ८ झाले. बेरीज आठ झाली.

आता आठ अधिक पाच ही बेरीज करु. त्यासाठी ८ मण्यांच्या पुढच्या पाच संख्या मोजू. **९, १०, ११, १२, १३.** एकूण मणी **१३** झाले.




एका संख्येत दुसरी संख्या मिळवताना पहिल्या संख्येच्या पुढील दुसऱ्या संख्येएवढ्या संख्या क्रमाने मोजल्या की बेरीज मिळते.

दोन संख्यांची बेरीज करताना मोठ्या संख्येच्या पुढील लहान संख्येएवढ्या संख्या क्रमाने मोजणे सोपे असते. **४ + ९** ही बेरीज करताना **४** नंतर नऊ संख्या मोजण्यापेक्षा **९** च्या पुढे चार संख्या मोजणे सोपे आहे.

चल बेरजेचा सराव करु.

